# विवाह संस्कार : ‘खूबसूरत’ ते ‘वेडिंगचा शिनेमा’



**डॉ. अनघा लवळेकर**
anagha.lavalekar@jnanaprabodhini.org

आपल्यापैकी अनेकांना ३५–४० वर्षांपूर्वी आलेला ‘खुबसूरत’ हा हलकाफुलका अतिशय सुंदर चित्रपट आठवत असेल. बहिणीचे लग्न ठरवण्यासाठी आलेल्या मुलाकडच्या पाहुण्यांची झालेली गंमत आणि त्यानंतर साधा सोपा घरगुती लग्न समारंभ. रिसेप्शनला आलेल्या लोकांना मिळालेले आइस्क्रीम इतकीच काय ती त्या लग्नातली चंगळ! त्याकाळी बहुतेक लग्नं याच छापाची असायची. मुख्य भर होता तो विवाहाच्या विधींवर आणि त्यातील छोट्या छोट्या अर्थपूर्ण कृतींवर. नुकताच काही वर्षांपूर्वी आलेला ‘वेडिंगचा शिनेमा’ हा चित्रपट आपल्याला आजच्या काळातील विवाहाची संकल्पना दाखवतो. त्यात प्री–वेडिंग शूटपासून लग्नाच्या निमित्ताने होणाऱ्या अनेक नव्याने सुरू झालेल्या प्रथांचेही दर्शन घडते. विवाह संस्कार त्या सगळ्या मोठ्या समारंभातला एक छोटासा भाग बनून राहतो.

आता तर ''डेस्टिनेशन'' वेडिंग किंवा ''थीम'' वेडिंग असे अनेक उपप्रकार आले आहेत. विवाह संस्काराचा एकीकडे असा मार्केट डिस्प्ले वाढत असताना, त्यातील मूळ संस्काराविषयी कोणी विचार तरी करतो का? याबद्दलच शंका वाटावी अशी परिस्थिती आहे. या लेखाच्या निमित्ताने भारतीय परंपरेतील 'विवाह संस्कार' आणि त्यामागचे विचार किंवा संकल्पना यावर काही नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे.

## विवाह प्रथेचा उगम

विवाह प्रथेचा उगम कसा झाला? याबद्दल बरेच विचार, प्रवाह आहेत. परंतु प्रामुख्याने टोळी स्वरूपातून भटक्या जीवन पद्धतीतून शेती करता करता माणूस जेव्हा स्थिरावला आणि त्याला छोट्या कुटुंबांमध्ये राहिले पाहिजे, असे वाटू लागले तेव्हा 'पुरुषाने आपल्या घराण्याचा जनुकीय आणि आर्थिक वारसा निश्चित करण्यासाठी ठराविक स्त्री किंवा स्त्रियांबरोबर संबंध ठेवावेत आणि त्यातून पुढची पिढी निर्माण व्हावी' असे काही घडले असावे. तोपर्यंत हळूहळू निर्माण झालेल्या धर्म संस्थेने, या नात्याला कशाचातरी भक्कम पाया असावा आणि तो जोपासला जावा म्हणून त्याला मान्यता द्यावी, अशा विचारांतून विवाहाचा संस्कार रूढ झाला असे मानता येईल. अर्थातच; त्यानंतर गेल्या अनेक शतकात विवाह संस्काराचे महत्त्व वेगवेगळ्या प्रकारे जपण्याचा आणि जोपासण्याचा प्रयत्नही झाला आहे.

## कुटुंबसंस्थेतील विवाहाचे स्थान

कुटुंब हे समाजाचे एक मूलभूत लघुतम अंग मानले तर त्याला कर्तव्यांची एक निश्चित चौकट देण्यासाठी विवाह संस्काराचा उपयोग झाला असणार. म्हणूनच जगातील प्रत्येक संस्कृतीमध्ये विवाह संस्कार वेगवेगळ्या रूपांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या शतकानुशतके जपला गेला आहे. भारतीय समाजामध्येही विविध प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे विवाहाचा विधी पार पाडला जातो. त्यात अनेक छोटे छोटे भेद आहेत. परंतु भारतीय समाजात विवाह हा केवळ उपचार किंवा करार नसून 'स्वतःच्या आणि कुटुंबाच्या मनोधारणेवर जाणीवपूर्वक करून घेतला जाणारा एक संस्कार' असे मानले आहे.

आधुनिक जगात कायद्यांचे अधिष्ठान असताना समाज धारणेसाठी वेगळा विवाह संस्कार कशासाठी? असा प्रश्न अनेक जणांना पडतो, आणि तो तर्कदृष्ट्या योग्यच आहे. परंतु लेखी कायद्याने समाज केवळ रक्षला गेला तरी, बांधला जात नाही ही कायद्याची मर्यादा आहे. त्यासाठी परंपरेच्या चिवट धाग्याने विणले गेलेले वैयक्तिक व सामूहिक संस्कार हेच कारणीभूत ठरतात, असे जगाचा इतिहास सांगतो. म्हणूनच भारतीय जीवनात आजही विवाहाच्या संस्काराला काही ना काही महत्त्व आहे.

## संस्काराची मानसिक तयारी

हिंदू विवाह पद्धतीत सुरुवातीला कोणत्याही संस्कारात ''गणेश'' पूजन केले जाते. गणेश हा मानवाची चित्तवृत्ती निर्मळ करणारा, शुभशक्तींना पाठबळ देणारा देव म्हणून ओळखला जातो. चित्तशुद्धी केल्यानंतर 'पुण्याहवाचन' हा उपचार होतो. 'पुण्य+अहन+वाचन' म्हणजेच ही कृती कुठे होत आहे? केव्हा होत आहे? कशी होत आहे? का केली जात आहे? अशा सर्व प्रश्नांचे उत्तर त्या विधीतून दिले जाते.

हा विधी उपस्थित सर्वांच्या साक्षीने होत असल्यामुळे ते तपशील उपस्थितांपर्यंत पोहोचतात. म्हणजेच; विवाह संस्कारात

सामील असणारे वधू-वर एकमेकांना दिलेल्या वचनाबाबत समाजालाही बांधील राहतात. सहजासहजी ती वचने मोडण्याचे किंवा एकमेकांच्या बद्दलची कमिटमेंट उलन जाण्याचे धैर्य त्यांना होऊ नये, याचीच जणूकाही पुण्याहवाचन काळजी घेते. त्यानंतर होतो ''मधुपर्का''चा विधी. म्हणजेच वधूच्या कुटुंबाने वराकडील कुटुंबांना काहीतरी गोड देऊन त्यांचे स्वागत करणे. आताच्या काळात दोन्ही कुटुंबे एकमेकांचा असा स्वीकार व स्वागत करताना आपण पाहतोच. जणू काही या नव्या नात्याचा प्रारंभ होताना, जुन्या नात्याचाच विस्तार होतो आहे असे यातून दर्शवले जाते.

## कन्यादान : जबाबदारीची जाणीव

हिंदू विवाह संस्कारातील महत्त्वाचा विधी म्हणजे कन्यादान! पूर्वी कन्याच प्रामुख्याने वराच्या घरी जात असे आणि त्यामुळे तिने नवीन नात्यांना आपलेसे करणे, जुन्या नात्यांमध्ये पाय गुंतून राहू नये म्हणून हा लाक्षणिक विधी केला जात असावा. परंतु आता 'कन्यादान' ह्या नावाने विधी होत असला तरी, त्याचा भाव 'कन्या-पुत्र-प्रदान' असा असायला हवा, असे नक्की वाटते. थोडक्यात; दोन्हीकडच्या ज्येष्ठांनी आपापल्या अपत्याला सहचराच्या स्वाधीन करणे अपेक्षित आहे. 'आता हे आयुष्य तुम्ही दोघांनी एकमेकांसमवेत घालवायचे आहे, तेव्हा आम्ही फक्त आवश्यकता वाटली तर सल्ल्यासाठी किंवा मदतीसाठी आहोत' असा भाव त्यातून पोहोचायला हवा.

कन्यादानाला 'स्वयंवर' हाही एक पर्याय हिंदू विवाह विधीत आहे, ज्यात वधूला स्वतःच्या निवडीच्या हक्कांचा वापर करून, हव्या त्या वराची वरमाला मिळवण्याचा अधिकार किंवा संधी दिलेली आहे. या सर्व विधींदरम्यान म्हटले जाणारे वैदिक मंत्र कोणताही अपभ्रंश न होता शतकानुशतके, तसेच्या तसे म्हटले जात आहेत. या मंत्रांमध्ये काव्यमयरित्या वधू आणि वरांची समानता दर्शवलेली आहे. दोघांनी एकमेकांची अनुमती घेणे अभिप्रेत आहे. म्हणजेच, एकमेकांना बरोबरचे स्थान देण्याची अपेक्षा आहे.

## अक्षतारोपण : पुरुषार्थांचे आशीर्वाद

कन्यादान नंतर होणाऱ्या 'अक्षतारोपण' ह्या विधीमध्ये धर्म अर्थ काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ मिळवण्यासाठी त्यांनी एकमेकांना तथास्तु म्हणायचे असते. म्हणजेच एकमेकांना





कायम सोबत करण्याची, पाठबळ देण्याची जणू काही ही रंगीत तालीमच.

ऋग्वेदामध्ये सूर्या आणि आश्विन या देवतांच्या लग्नाचे वर्णन आलेले आहे (मंडल १०,सूक्त ५). प्रजापतीने आपल्या 'सूर्या' या कन्येचा विवाह सोम ह्या देवाशी ठरवला. परंतु सोम हा अतिशय उद्धट, उदंड आणि व्यसनी होता. त्यामुळे सूर्याला त्याच्याशी विवाह करायचा नव्हता. पण सोमाच्या धाकापुढे ती थोडीशी घाबरली होती. त्यामुळे तिने आवाहन करून देवसभा बोलावली. त्यात तिने स्वतःचे मत आणि चिंता व्यक्त केली. तेव्हा सर्व देवसभेने मिळून निर्णय घेतला की, तिच्यावर अशी जबरदस्ती करता येणार नाही. अग्नी देवाच्या साहाय्याने सोमाचा बंदोबस्त केला गेला आणि मग सूर्याचे स्वयंवर रचले गेले. तिने 'रथांच्या शर्यतीत प्रथम येणाऱ्यास मी निवडेन' असे म्हटले आणि त्यानुसार 'आश्विन' या वराची निवड केली. अशा अनेक कथा आपल्या संस्कृतीत मांडल्या गेलेल्या अधिकारांचे दाखले देतात.

अक्षतारोपण आणि मंगलसूत्र बंधनानंतर होते ते पाणिग्रहण. 'पाणि' म्हणजे 'हात'. हात हे महत्त्वाचे कर्मेंद्रिय आहे. एकमेकांचा हात हातात घेणे म्हणजे एकमेकांना मैत्रीपूर्वक सहकार्य करण्याचे वचन देणे. जणू काही 'मी आता तुझ्या कामात माझा सहभाग देणार आहे' हा शब्द पाणिग्रहणातून परस्परांना द्यावा असे सूचित केले आहे. वृद्धापकाळापर्यंत एकमेकांची साथ करू आणि गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये सोबतीने पार पाडू, असे जणू अभिवचनच ह्यातून एकमेकांना दिले जाते.

विवाहाचा होम हा मुख्यतः वर-वधूने करायच्या संकल्पासाठी अग्नीला साक्षी ठेवण्याची मांडणी आहे. कारण विवाहानंतर एकमेकांचे आणि कुटुंबाचे भरण पोषण करण्याची जबाबदारी वधू-वरांवर येते. त्यासाठी अग्नीचे सहकार्य हवेच. ते प्रकाशतत्त्वही आहे आणि गृहस्थ धर्माची ती गरजही आहे. थोडक्यात, होमाच्या वेळी घेतलेल्या प्रतिज्ञांचा त्रिवार उच्चार होतो, तेव्हा सहजीवनाचा संकल्प दृढ व्हावा अशीच त्यामागे भूमिका असते.

## सप्तपदी : सहजीवनाचा प्रवास

होमानंतर येते ती 'सप्तपदी'! सोबत चालायची सात पावले ही जणू काही पुढे आयुष्यभर एकमेकांच्या साक्षीने जी वाट चालायची आहे त्याचे प्रतीक. वधू आणि वर हे दोघेही वेगवेगळ्या कुटुंबातील, वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे, वेगवेगळ्या सामाजिक संस्कारांमधून आलेले असतात. परस्परांची निवड केल्यावर एकमेकांना हळूहळू अनुरूप होत जावे, याची मानसिक तयारी म्हणून सप्तपदीची रचना आहे. एकमेकांना नुसतेच अनुकूल होणे पुरेसे नाही; एकमेकांचे गुणग्रहण करणे, त्या गुणांना आपलेसे करणे, एकमेकांच्या दोषांचा काही प्रमाणात स्वीकार करून परस्परस्नेह वाढवण्यासाठी प्रयत्न करणे, हे सर्व सप्तपदीच्या संकेतांमध्ये सामावले आहे. थोडक्यात; या नात्यातून परस्पर पूरकता सहजपणे निर्माण होण्यासाठी. त्याची आठवण राहण्यासाठी ही सांकेतिक 'सात पावले' सोबत चालायची असतात.

## वैवाहिक मैत्रीभाव

विवाहाचा एक महत्त्वाचा उद्देश मानवी वंश चालू ठेवणे हा असला तरी तो एकमेव उद्देश नाही. परस्परांना सुखावह ठरणारे सहजीवन उमलत जाणे हा खरा दीर्घकालीन उद्देश आहे. भर्तृहरीने एका श्लोकात 'मित्रलक्षणे' सांगितली आहेत -

*पापात निवारयति, योजयते हिताय,*
*गुह्यं निगूहती, गुणान प्रकटी करोति,*
*आपदगतम न जहाती, ददाती काले,*
*सन्मित्रलक्षणं इदम प्रवदंती संता:*

मित्र कसा असावा? तर जो दोषांचे हरण करेल, आपल्या हिताचेच काही करेल, आपली गुपिते जपून ठेवेल, गुण प्रकट करायला मदत करेल, संकटामध्ये पळून जाणार नाही अशा सर्व लक्षणांनी युक्त असतो तो खरा मित्र. भारतीय विवाह संस्कारामध्ये पती-पत्नीमध्ये अशा प्रकारचे मित्रत्वाचे नाते निर्माण होणे अपेक्षित आहे. दोन भिन्न व्यक्ती असल्या तरीही हळूहळू त्यांचे मन, विचार ह्याचे काही प्रमाणात अद्वैत व्हावे, असेही सुचवले आहे. अर्थात व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र धाटणी बिघडू न देता सुद्धा हे घडू शकते, यावर आपला विश्वास असायला हवा.

## बोहल्यावर उभे राहणे : संस्काराची कर्मसमाप्ती

विवाह संस्काराची कर्म समाप्ती म्हणजे बोहल्यावर उभे राहणे. बोहोले हा शब्द सुद्धा 'बहुल' म्हणजे अग्नी यातून आला आहे. संस्कृतमध्ये यालाच 'वेदी' असे संबोधले आहे. या नात्यामध्ये अग्नीचे स्थान म्हणजे गृहस्थाने किंवा गृहिणीने करावयाची कर्तव्ये साक्षीभावाने पाहणारा एक ईश्वरी दूत असे म्हणता येईल. यानंतर होणारी मंगलाष्टकांची भर ही आलेल्या पाहुण्यांचे थोडेसे मनोरंजन व्हावे आणि विवाहविधी संपल्याची खूणगाठ बांधता यावी म्हणून रचला गेला असावा.

या सगळ्या संस्कारविधींच्या पार्श्वभूमीवर आजच्या विवाहाचा चेहरामोहरा पाहिला तर, या सर्व उपचारांमधील मर्म लक्षात न घेता केवळ उपचार, रूढी किंवा कर्मकांड यासाठीच ते केले जात आहेत असे वाटते. मात्र भारतीय कुटुंबाची रचना ही व्यक्तींनी परस्पर पूरक असण्यासाठी झालेली आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. मध्यंतरीच्या काही शतकांमध्ये असलेल्या पितृसत्ताक पद्धतीला आता छेद जातो आहे, तोही आजच्या सामाजिक गरजांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. काही तात्पुरत्या समस्या त्यातून निर्माण होणार आहेत, पण त्यातून हळूहळू विवाह संस्काराची मूळ धारणा बळकट होण्यासाठी मदतच होईल असे नक्की वाटते.

मुक्त बाजारपेठ आणि अतिशय टोकाची व्यक्तिकेंद्रितता यामुळे चंगळवादाला जे खतपाणी मिळत आहे, त्याचेही मुख्य आव्हान कुटुंब स्वास्थ्यासमोर आहे. अशा प्रकारच्या वृत्ती वाढीला लागल्यामुळेच विवाह संस्कारासारख्या अर्थपूर्ण आणि गांभीर्यपूर्वक करण्याच्या विधीला केवळ एका दिखाऊ सोहळ्याचे, निव्वळ मौजमजेचे रूप प्राप्त होत आहे, ते टाळले पाहिजे.

## संस्कारांचे पुनर्मूल्यांकन

पारंपरिक विवाह संस्कारांमधील वर उल्लेखलेले सर्व विधी त्याचा गाभा आहेत. काही छोटी मोठी कर्मकांडे जर या मुख्य विधींचे महत्त्व आणि गांभीर्य कमी करत असतील तर, ती वगळून टाकता येतील. ज्ञानप्रबोधिनीप्रणित विवाह-संस्कार विधीमध्ये नेमका हाच हेतू मनात धरून संस्काराची अतिशय सार्थ पुनर्मांडणी केलेली आहे. दरवर्षी या संस्कार विधीला अनुसरून शेकडो विवाह संपन्न होत असतात. ही पुनर्मांडणी करताना त्यात कुटुंबाप्रति असलेल्या जबाबदारी बरोबरच सामाजिक जबाबदारीचे भान देण्याचाही भाग सम्मीलित केला आहे, हे त्याचे वैशिष्ट्य. सहजीवनाच्या वाटेवर पाऊल टाकताना

उभयतांच्या हिताचे आणि स्त्री-पुरुषत्वाचे अहंकार बाजूला ठेवून जे संकल्प करायचे, त्याचे सिंचन ह्या संस्कारातून व्हावे अशी अपेक्षा आहे. त्यासाठी हे चिंतन.

**(लेखिका, पुणे येथील ख्यातकीर्त मानसतज्ज्ञ असून, ज्ञान प्रबोधिनी संचलित प्रज्ञा मानस संशोधिकेच्या त्या प्रमुख आहेत. प्राध्यापिका, उत्तम वक्ता, उत्तम लेखिका असलेल्या त्यांची आजवर अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.)**

❑



## वीण नात्यांची

नात्यांना तराजूत तोलू नका
भावनांना बाजारात विकू नका!

आई-बापाची माया असते अनमोल
रुतलेली मूळ गुणसूत्रात खोल!
राहू नका अबोल, तुम्ही बोलते व्हा
स्वतःसाठी किमान गुणी-कर्ते व्हा!

रोज रोज एकटे तुम्ही पडू नका
नात्यांना तराजूत तोलू नका
भावनांना बाजारात विकू नका!

असला दुरावा तरी दूरवर नका जाऊ
गोड स्वप्नं सारी आपण मिळूनच पाहू!
शब्दा-शब्दांनी नका वाढवू खोटे वाद
आपणच द्यावी एकमेका छान साद!

गुंफलेल्या माळेला चुकूनही तोडू नका
नात्यांना तराजूत तोलू नका
भावनांना बाजारात विकू नका!

एकटेपणा चार भिंती नकोशा वाटतात
मोकळा श्वास, प्रेम हवीशी असतात!
प्रेमाच्या शब्दांची ऊब असते लई भारी
जादू भरल्या स्पर्शाची किमयाच न्यारी!

उगाचच नात्यांची वीण मोडू नका
नात्यांना तराजूत तोलू नका
भावनांना बाजारात विकू नका!

नात्यांचे बंध खूप सुंदर असतात
मनात आनंदाची पेरणी करतात!
सोबतीचं मोल नेहमीच असतं
मनात सगळ्यांच्या एकच असतं!

भेटा, बोला, एकमेका सोडू नका
नात्यांना तराजूत तोलू नका
भावनांना बाजारात विकू नका!

**– डॉ. पुष्पा गायकवाड, नांदेड**